**प्रेस नोट** दिनांक १०/११/२०२४



## ॲन्टॉप हिल पोलीस ठाणे,मुंबई

## १९ वर्षापासुन फरार आरोपी यास अटक केलेबाबत

प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी ,६१वे न्यायालय,कुर्ला मुंबई यांच्या कोर्ट केस क्रमाक ccno. 2503/PW/2005 (Cr No-136/1992 us 336,506(2),114 IPC ) मधील आरोपी नामे प्रकाश अनंत सुर्वे वय ५७ वर्षे धंदा— नौकरी राठी— रूम नंबर २०३,चाळ नंबर ए/११,प्रतिक्षा नगर चाळ,सायन कोळीवाडा मुंबई यांचेविरूध्द मा.न्यायालयाने स्टॅन्डींग अटक वारंट जारी केले होते सदर वारंट बजावणीकरीता ॲन्टॉप हिल पोलीस ठाणेस प्राप्त झाले होते.

सदरचे वारंट बजावणी करीता तसेच फरारी आरोपीचा शोध घेणेकरीता तडीपार पथक यांना मा.वरिष्ठांनी सुचना देउन एक विशेष पथक तयार करण्यात आले.

सदर तडीपार पथकाने नमुद आरोपीताचा शोध घेण्याकरीता नमुद गुन्हयाचे जुने कागदपत्रे हे प्राप्त केले. त्यात नमुद असणारे त्याचे मित्र व नातेवाईक यांची माहिती प्राप्त केली.तसेच आरोपी रहात असलेला पत्ता प्रतिक्षा नगर येथील नमुद चाळ क्रं २०३ येथे आरोपी नामे प्रकाश अनंत सुर्वे यांबाबत चौकशी केली असता सदरचा गुन्हयास खुप अवधी झाल्याने त्याची माहिती मिळुन येत नव्हती त्यामुळे त्याच शोध लागत नव्हता. तडीपार पथकाचे पोउपनि सिंध्दीकी व पोह/महेश भोसले यांनी प्रतिक्षा नगर चाळ क्रं. २०३ मधील रहाणारे रहिवासी यांना विश्वासात घेउन माहिती प्राप्त केली की नमुद चाळीतील रहिवासी हे ट्रान्झीट केलेले होते. त्यांना आता कोठे रूम अलॉट केले आहे त्यावेळी स्थानिक रहिवासी तसेच गुप्त बातमीदारामार्फत सदर चाळीतील ट्रान्झीट रहिवासी हे उमरखाडी,डोंगरी येथील रहिवासी होते व ते परत उमरखाडी डोंगरी मुंबई येथे गेले असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली. प्राप्त बातमीवरून पोउपनि सिध्दीकी यांनी त्यांचे उमरखाडी डोंगरी मुंबई येथील गुप्त बातमीदाराच्या मार्फतीने त्यांचा शोध घेतला तसेच उमरखाडी येथे असलेल्या सुर्वे बार याच्या आजुबाजुस असलेल्या परिसरात चौकशी केली असता नमुद आरोपी यांचे नातेवाईक यांचा

शोध लागला. तसेच नमुद आरोपीबाबत माहिती मिळाली की सदरचा फरार आरोपी हा बोटीवर काम करतो व तो काही दिवसांसाठीच मुंबईत नातेवाईकांकडे येतो.दिवाळी सणासाठी नमुद आरोपी हा त्यांच्या नातेवाईकांच्या घरी येणार म्हणुन त्याची घरावर पाळत ठेवण्यात आली होती परंतु तो फरारी आरोपी हा घरी आला नाही. दि. ०८/११/२०२४ रोजी नमुद फरारी आरोपी हा त्यांच्या नातेवाईकांकडे येणार असल्याबाबत गोपनिय माहिती प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने तडीपार अधिकारी व पाहिजे/फरारी आरोपी शोध पथकाचे पोउपनि सिध्दीकी व पोह महेश भोसले व पोह निलेश चौधरी,पोह/गोरख सानप असे पथक हे उमरखाडी येथै पाळत ठेवुन गोपनिय माहती नुसार सदर आरोपीताशी मिळता–जुळता वर्णनाचा इसम आल्याने त्यास पोलीस ठाणेस आणुन त्याकडे चौकशी केली असता तो आरोपी हा प्रकाश अनंत सुर्वे वय ५७ वर्षे राठी– रूम नंबर २०३,चाळ नंबर ए/११,प्रतिक्षा नगर चाळ,सायन कोळीवाडा मुंबई हाच असल्याची खात्री झाल्याने त्याबाबत वरिष्ठांना अवगत करून त्यास फेरअटक करण्यात आली आहे.

आरोपीचा नाव व पत्ता :– प्रकाश अनंत सुर्वे वय ५७ वर्षे राठी– रूम नंबर २०३,चाळ नंबर ए/११,प्रतिक्षा नगर चाळ,सायन कोळीवाडा मुंबई सध्या राठी रूम नंबर ५०४,,५वा माळा, शिवदर्शन सोसायटी,उमरखाडी,डोंगरी मुंबई –०९

आरोपीचा सहभाग असलेल्या गुन्हयाची माहिती :– Cr No-136/1992 us 336,506(2),114 IPC

सदरची कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त ,मध्य प्रादेशीक विभाग श्री.अनिल पारसकर,मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ श्रीमती रागसुधा आर. मा.सहायक पोलीस आयुक्त भोईवाडा विभाग शैलेंद्र धिवार,वरिष्ठ पोलीस निरीक्षक ॲन्टॉप हिल पोलीस ठाणे श्री. सुधाकर ढाणे, यांचे मार्गदर्शनाखाली स.पोनि सुरेश कांबळे (का व सु ), तडीपार अधिकारी पोउपनि अरफात सिध्दीकी,पोह/महेश भोसले,पोह/निलेश चौधरी, पोह/गोरख सानप यांनी पार पाडली आहे.